# भारती विद्यापीठ, पुणे

( संस्थापक - माननीय कुलपती डॉ. पतंगराव कदम )

# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस

## प्रमाणपत्र परीक्षा

भारती विद्यापीठ अंतर्गत

शास्त्रीय संगीत

# गायन व स्वरवाद्य अभ्यासक्रम

प्रारंभीक ते उच्च पदविका भाग २



# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

**संगीत (गायन / स्वरवाद्य) अभ्यासक्रम**

## <u>प्राथमिक परीक्षा</u>

**एकूण गुण – ५०** **परीक्षेचा कालावधी – १५ मी.**

**किमान गुण – १८**

---

**सैद्धांतिक :** **एकूण गुण – १५**

या परीक्षेसाठी लेखी परीक्षा घेण्यात येणार नाही. सैद्धांतिक भाग प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी विचारण्यात येईल.

१. व्याख्या – संगीत, अलंकार, सरगम गीत, राग, ताल, मात्रा, सम, खंड (विभाग), टाळी, खाली (काल).

२. अभ्यासक्रमातील रागांची माहिती. उदा- स्वर, वादी, संवादी, आरोह, अवरोह, पकड, थाट, गायन समय.

३. तीनताल, केरवा, दादरा तालांची माहिती आणि हातावर टाळी देऊन म्हणण्याची क्षमता.

**प्रात्यक्षिक :** **एकूण गुण – ३५**

१. खालील १० स्वरालंकारांचा अभ्यास.
   - अ. सा रे ग म --------
   - आ. सारे रेग -------
   - इ. सारेग रेगम -------
   - ई. सारेसा रेगरे -------
   - उ. सारेगम रेगमप -------
   - ऊ. सागरेसा रेमगरे -------
   - ए. सारेगसा रेगमरे -------
   - ऐ. साग रेम -------
   - ऑ. सारेगमप रेगमपध -------
   - ऒ. सारेसाग रेगरेम -------

२. खालील रागांपैकी कोणत्याही दोन रागांमध्ये सरगम गीत.
   यमन, भैरव, काफी, भूप, भीमपलास.

३. खालील प्रत्येक रागांमध्ये एक बंदिश. (छोटा ख्याल / गत)
   यमन, भैरव, काफी, भूप, भीमपलास.

४. स्वर समूहाच्या आधारावर उल्लेखित राग ओळखण्याचा अभ्यास.

**प्रात्यक्षिक परीक्षेसाठी सुचना –**

१. अभ्यासक्रमातील अलंकार, सरगम गीत, बंदिश / गत तबल्याच्या साथीने गाता येणे / वाजविता येणे आवश्यक.
२. अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक असेल.
३. प्रात्यक्षिक परीक्षेत हार्मोनियम साथीला घेता येईल मात्र सोबत इलेक्ट्रॉनिक तानपुरा असणे आवश्यक.
४. परीक्षा कक्षात विद्यार्थी, परीक्षक, साथीदार व केंद्र व्यवस्थापकाशिवाय इतर कुणी हजर असू नये.
५. विद्यार्थी परीक्षेचे ध्वनिमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे. .

+-+-+-+

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

**संगीत (गायन / स्वरवाद्य) अभ्यासक्रम**

**<u>प्रमाणपत्र परीक्षा – भाग १</u>**

**एकूण गुण – ७५** **परीक्षेचा कालावधी – २० मी.**

**किमान गुण – २७**

---

**सैद्धांतिक :** **एकूण गुण – १५**

या परीक्षेसाठी लेखी परीक्षा घेण्यात येणार नाही. परंतु सैद्धांतिक विषयातील अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षेत विचारण्यात येईल.

१. स्वरांची नावे उदा – षड्ज, रिषभ इत्यादी माहिती सांगणे.
२. खालील शब्दांची व्याख्या,
   सप्तक, अलंकार, आरोह, अवरोह, पकड, राग, राग जाती, थाट, नाद, ताल, लय, आवर्तन, सरगम गीत, लक्षण गीत, स्थायी, अंतरा इत्यादी.
३. अभ्यासक्रमातील रागांची माहिती. उदा- स्वर, वादी, संवादी, आरोह, अवरोह पकड, थाट, गायन समय इत्यादी.

**प्रात्यक्षिक :** **एकूण गुण – ६०**

१. मागील परीक्षेतील अलंकार या वर्षीच्या अभ्यासक्रमातील रागांमध्ये म्हणण्याची क्षमता.
२. कोमल, तीव्र स्वर गाण्याचा / वाजविण्याचा अभ्यास तसेच अलंकार गाताना / वाजविताना उपयोग.
३. खालील प्रत्येक रागामध्ये एक मध्यलय बंदिश / गत आणि चार रागात किमान ३ - ४ आलाप आणि तान.
   यमन, बागेश्री, काफी, खमाज, भूप, देस
४. खालील रागांमध्ये दोन सरगम गीत आणि दोन लक्षण गीत / वाद्य वादनासाठी तंत्र अंगाची गत.
   यमन, बागेश्री, काफी, खमाज, भूप, देस
५. वर उल्लेखित रागांमध्ये ताल झपताल मधील एक बंदिश / गत.
६. एक भजन.
७. झपताल, एकताल, रूपक यांची माहिती आणि हातावर टाळी देऊन म्हणण्याची क्षमता.

**प्रात्यक्षिक परीक्षेसाठी सुचना –**

१. अभ्यासक्रमातील अलंकार, सरगम गीत, बंदिश / गत तबल्याच्या साथीने गाता येणे / वाजविता येणे आवश्यक.
२. अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक असेल.
३. प्रात्यक्षिक परीक्षेत हार्मोनियम साथीला घेता येईल मात्र सोबत इलेक्ट्रॉनिक तानपुरा असणे आवश्यक.
४. परीक्षा कक्षात विद्यार्थी, परीक्षक, साथीदार व केंद्र व्यवस्थापकाशिवाय इतर कुणी हजर असू नये.
५. विद्यार्थी परीक्षेचे ध्वनिमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे. .

+-+-+-+

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

**संगीत (गायन / स्वरवाद्य) अभ्यासक्रम**

**<u>प्रमाणपत्र परीक्षा - भाग २</u>**

**एकूण गुण – १२५**

---

**सैद्धांतिक:** **परीक्षेचा कालावधी – २ तास**

**एकूण गुण – ५०** **किमान गुण – १८**

या अभ्यासक्रमासाठी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

१. "राग" व्याख्या आणि सविस्तर माहिती.

२. खालील संकल्पनांची माहिती,
   श्रुती, स्वर (शुद्ध, कोमल, तीव्र), वादी, संवादी, अनुवादि, विवादी स्वर, गायन समय, गीताचे अवयव ( स्थायी, अंतरा, संचारी, अभोग), वर्ण आणि त्याचे प्रकार, मींड, गमक, घसीट, लय आणि लयीचे प्रकार.

३. 'थाट' व्याख्या आणि माहिती.

४. 'ताल' व्याख्या आणि त्यातील घटकांची माहिती (टाळी, खाली / काल, सम, मात्रा, आवर्तन, खंड)

५. पं. भातखंडे आणि पं. पलुसकर स्वरलेखन पद्धतीची माहिती.

६. अभ्यासक्रमातील रागांमधील सरगम गीत, बंदिश / गत लिपीबद्ध करणे.

७. खालील उल्लेखित तालांची माहिती व ठेका दुगुनमध्ये लिपीबद्ध करण्याची क्षमता –
   केहेरवा, दादरा, रूपक, झपताल, तीनताल, एकताल.

८. खालील रागांची शास्त्रीय माहिती.
   वृन्दावनि सारंग, तिलक कामोद, जौनपुरी, मालकंस, केदार, अल्हैया बिलावल.

**प्रात्यक्षिक:** **परीक्षेचा कालावधी - २० मी.**

**एकूण गुण – ७५** **किमान गुण – २७**

१. खालील अलंकारांचा अभ्यास –
   अ. सागरेसा रेमगरे.........
   आ. सारेगमगरे रेगमपमग .......
   इ. सारेगरेगमगरे रेगमगमपमग........
   ई. सागरेमगरे रेमगपमग.......

२. मागील परीक्षेतील रागांची उजळणी.

३. खालील कोणत्याही एका रागामध्ये बडाख्याल / विलंबित गत (फक्त बंदिश)
   वृन्दावनि सारंग, तिलक कामोद, जौनपुरी, मालकंस, केदार, अल्हैया बिलावल.

४. खालील प्रत्येक रागामध्ये एक छोटाख्याल / गत ज्यातील कोणत्याही दोन रागांमधील बंदिशींवर किमान पाच आलाप आणि तान.
   वृन्दावनि सारंग, तिलक कामोद, जौनपुरी, मालकंस, केदार, अल्हैया बिलावल.

BVSPA CERTIFICATE DIPLOMA

५. रूपक मध्ये एक बंदिश / गत.

६. धृपद (बंदिश आणि दुगून)

७. वरील रागांमधील कोणत्याही एका रागात एक तराणा / गत.

८. स्वर समूहांच्या आधारे राग ओळखण्याची क्षमता.

९. केहरवा,दादरा, रूपक, झपताल, तीनताल, एकताल या तालांचा अभ्यास – हातावर टाळी देऊन एकपट, दुप्पट करणे.

**प्रात्यक्षिक परीक्षेसाठी सुचना –**

१. अभ्यासक्रमातील अलंकार, सरगम गीत, बंदिश / गत तबल्याच्या साथीने गाता येणे / वाजविता येणे आवश्यक.

२. अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक असेल.

३. प्रात्यक्षिक परीक्षेत हार्मोनियम साथीला घेता येईल मात्र सोबत इलेक्ट्रॉनिक तानपुरा असणे आवश्यक.

४. परीक्षा कक्षात विद्यार्थी, परीक्षक, साथीदार व केंद्र व्यवस्थापकाशिवाय इतर कुणी हजर असू नये.

५. विद्यार्थी परीक्षेचे ध्वनिमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे.

+-+-+-+

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

**संगीत (गायन / स्वरवाद्य) अभ्यासक्रम**

## उच्च प्रमाणपत्र परीक्षा – भाग १

**एकूण गुण – २००**

---

**सैद्धांतिक:** **परीक्षेचा कालावधी – ३ तास**

**एकूण गुण – ७५** **किमान गुण – २७**

या अभ्यासक्रमासाठी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

१. प्रमाणपत्र २ परीक्षेमधील सर्व व्याख्या व संकल्पना तसेच खालील संकल्पनांची विस्तृत माहिती,
नाद आणि नादाचे गुण, श्रुती - स्वर विभाजन, आलाप, तान, तानांचे प्रकार.
२. 'जाती' - व्याख्या आणि प्रकार. (ओडव, षाडव, संपूर्ण).
३. राग आणि थाटाचे नियम.
४. १० थाटांची माहिती.
५. माहिती - ख्याल, बंदिश, सरगम गीत, लक्षण गीत, तराणा, धृपद, धमार,
६. या वर्षीच्या अभ्यासक्रमातील रागांचा शास्त्रीय अभ्यास आणि सरगम गीत, बंदिश / गत आलाप आणि तानांसह लिपीबद्ध करणे.
७. सांगीतीक योगदान - पं. भातखंडे, पं. विष्णू दिगंबर पलुसकर, पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, पं. रवीशंकर.
८. तालांचा ठेका, दुप्पट व चौपट लिपीबद्ध करणे – तीनताल, झपताल, रूपक, एकताल, सुलताल, चौताल.

**प्रात्यक्षिक:** **परीक्षेचा कालावधी - २५ मी.**

**एकूण गुण – १२५** **किमान गुण – ४४**

१. खालील पैकी कोणत्याही तीन रागात बडा ख्याल / मसितखानी गत आणि द्रुत बंदिश / रजाखानी गत सहा आलाप, तानांसह.
यमन, बिहाग, भूप, बागेश्री, भीमपलास.
२. खालील सर्व रागांमध्ये आलाप तानांसह द्रुत बंदिश / गत.
हमीर, पटदीप, वृन्दावनी सारंग, देस, तिलंग, देशकार.
३. एक तराणा (वाद्य वादनासाठी तंत्र अंगाची गत)
४. एक धृपद आणि धमार (वाद्य वादनासाठी वेगळया तालामधील दोन बंदिशी)
५. एक लोकगीत अथवा भजन / धून.
६. खालील तालांचा संपूर्ण अभ्यास तसेच हातावर टाळी धरून दुप्पट व चौपट करण्याची क्षमता.
तीनताल, झपताल, रूपक, चौताल, एकताल, सुलताल,
७. या वर्षीच्या अभ्यासक्रमातील सर्व रागांचा शास्त्रीय अभ्यास.
८. मागील परीक्षेतील रागांची उजळणी.

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

**प्रात्यक्षिक परीक्षेसाठी सुचना –**

१. अभ्यासक्रमातील सर्व घटक तबल्याच्या साथीने गाता येणे / वाजविता येणे आवश्यक.

२. अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक असेल.

३. प्रात्यक्षिक परीक्षेत हार्मोनियम साथीला घेता येईल मात्र सोबत इलेक्ट्रॉनिक तानपुरा असणे आवश्यक.

४. परीक्षा कक्षात विद्यार्थी, परीक्षक, साथीदार व केंद्र व्यवस्थापकाशिवाय इतर कुणी हजर असू नये.

५. विद्यार्थी परीक्षेचे ध्वनिमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे.

+-+-+-+

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

**संगीत (गायन / स्वरवाद्य) अभ्यासक्रम**

**<u>उच्च प्रमाणपत्र परीक्षा – भाग २</u>**

**एकूण गुण – २५०**

---

**सैद्धांतिक:** **परीक्षेचा कालावधी – ३ तास**

**एकूण गुण – १००** **किमान गुण – ३५**

या अभ्यासक्रमासाठी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

१. उच्च प्रमाणपत्र १ परीक्षेत उल्लेखित संकल्पना तसेच खालील शब्दांची माहिती,
श्रुती, कण स्वर, गमक, अध्वदर्शक स्वर, समप्रकृतिक राग, जाती गायनाची लक्षणे, प्रबंध, वस्तू.

२. राग समय चक्राची माहिती.

३. या वर्षीच्या अभ्यासक्रमातील रागांचे विलंबित ख्याल / विलंबित गत, मध्यलय बंदिशी / गत आणि आलाप, तान पं. भातखंडे, पं. पलुस्कर स्वरलेखन पद्धतीप्रमाणे लिपीबद्ध करणे.

४. खालील तालांची एकपट, दुप्पट, तिप्पट, चौपट पं. भातखंडे आणि पं. पलुस्कर स्वरालीपित लिपीबद्ध करणे,
तीनताल, झपताल, रूपक, चौताल, एकताल, सुलताल, दीपचंदी

५. गायक- वादकांचे गुण - दोष (श्लोकांसाहित)

६. सांगितीक योगदान – गोपालनायक, मानसिंग तोमर, तानसेन.

७. निबंध लेखन – जीवनात संगीताचे महत्व, शास्त्रीय संगीत व लोक संगीत.

८. या वर्षीच्या अभ्यासक्रमातील रागांचा शास्त्रीय अभ्यास.

९. गायन प्रकारांची माहिती – दादरा, कजरी, चैती, नाट्यगीत, सुगम संगीत.

**प्रात्यक्षिक:** **परीक्षेचा कालावधी - २५ मी.**

**एकूण गुण – १५०** **किमान गुण – ५३**

१. खालील रागांपैकी कोणत्याही चार रागांमध्ये आठ आलाप, बोल, आणि तानांसह बडाख्याल / मसितखानी गत आणि द्रुत बंदिश / रजाखानी गत. –
भैरव, मालकंस, भीमपलास, हमीर, केदार, वृन्दावनी सारंग

२. खालील रागांमध्ये आलाप, बोल, आणि तानांसह द्रुत बंदिश / गत. –
कामोद, गौड सारंग, जयजयवंती, पुरिया धनाश्री, शंकरा.

३. वरील उल्लेखित रागांमध्ये दोन तराणे / तंत्र अंगाची गत.

४. वरील कोणत्याही एका रागात एक धृपद आणि त्याची एकपट, दुप्पट आणि चौपट.

५. खालील प्रकारांपैकी कोणतेही एक सादर करणे.
नाट्य गीत, भाव गीत.

६. खालील तालांची एकपट, दुप्पट, तिप्पट, चौपट टाळी धरून म्हणण्याची क्षमता,
तीनताल, झपताल, रूपक, चौताल, एकताल, सुलताल, दीपचंदी

७. मागील परीक्षेतील रागांची उजळणी.

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

**प्रात्यक्षिक परीक्षेसाठी सुचना –**

१. अभ्यासक्रमातील सर्व घटक तबल्याच्या साथीने गाता येणे / वाजविता येणे आवश्यक.
२. अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक असेल.
३. प्रात्यक्षिक परीक्षेत हार्मोनियम साथीला घेता येईल मात्र सोबत इलेक्ट्रॉनिक तानपुरा असणे आवश्यक.
४. परीक्षा कक्षात विद्यार्थी, परीक्षक, साथीदार व केंद्र व्यवस्थापकाशिवाय इतर कुणी हजर असू नये.
५. विद्यार्थी परीक्षेचे ध्वनिमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे.

+-+-+-+

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

**संगीत (गायन / स्वरवाद्य) अभ्यासक्रम**

## पदविका परीक्षा – भाग १

**एकूण गुण – ४००**

---

**सैद्धांतिक:** **परीक्षेचा कालावधी – ३ तास / प्रश्नपत्र**

**एकूण गुण – १५०** **किमान गुण – ३० / प्रश्नपत्र**

या अभ्यासक्रमात सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**प्रश्नपत्र – १** **एकूण गुण – ७५**

१. भारतीय संगीताचा संक्षिप्त इतिहास (प्राचीन काळ).
२. जाती गायनाची विस्तृत माहिती.
३. धृपद आणि त्याच्या विविध बानी तसेच धमार यांची माहिती.
४. ख्याल, ठुमरी, टप्पा, चतरंग या प्रकारांची माहिती.
५. तान आणि त्याच्या विविध प्रकारांची माहिती व या वर्षीच्या अभ्यासक्रमातील रागांमध्ये लिपीबद्ध करण्याची क्षमता.
६. अभ्यासक्रमातील रागांच्या विलंबित व मध्यलय बंदिशी / गत, आलाप आणि तान पं. भातखंडे आणि पं. पलुसकर स्वरलेखन पद्धतीत लिपीबद्ध करण्याची क्षमता.
७. खालील ताल आणि त्यांच्या ठेक्याची एकपट, दुप्पट, तिप्पट, चौपट लिहिण्याची क्षमता, धमार,दीपचंदी,तिलवाडा,तीनताल,झपताल,एकताल.
८. या वर्षीच्या अभ्यासक्रमातील रागांचा शास्त्रीय अभ्यास.
९. तानपुऱ्याची संपूर्ण माहिती.

**प्रश्नपत्र – २** **एकूण गुण – ७५**

१. गायन, वादनातील घराणी आणि त्यातील कलाकारांची माहिती.
२. राग वर्गीकरण पद्धती – थाट राग वर्गीकरण पद्धती, रागांग राग वर्गीकरण पद्धती.
३. संगीत आणि इतर कलांचा संबंध.
४. संगीतात भाषेचे महत्व.
५. स्वरलिपी पद्धतीचा संक्षिप्त इतिहास.
६. राग समयचक्राची विस्तृत माहिती.
७. वाद्य वर्गीकरण
८. पं. व्यंकटमखी यांचा ७२ थाट सिद्धांत.
९. भरतद्वारे श्रुती स्वर विभाजन.

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

**प्रात्यक्षिक :** **परीक्षेचा कालावधी - ३० मी.**

**एकूण गुण – २५०**

**अ. रंगमंच सादरीकरण -** **एकूण गुण – ७५**

**किमान गुण – ३०**

अभ्यासक्रमातील कोणत्याही एका रागात बडाख्याल / विलंबित गत आणि द्रुत बंदिश / गत विस्तारासह किमान १५ ते २० मिनिटे सादर करणे. (प्रात्यक्षिक परीक्षेत गायलेल्या रागाव्यतिरिक्त)

**रंगमंच सादरीकरणासाठी सुचना –**

१. तोंडी परीक्षेव्यतिरिक्त रंगमंच सादरीकरणासाठी १५ ते २० मिनिटांचा वेळ निश्चित करण्यात आला आहे.
२. रंगमंच सादरीकरण होत असताना इतर परीक्षार्थी, श्रोता उपस्थित राहू शकतात.
३. रंगमंच सादरीकरणात तबल्याबरोबरच हार्मोनियम सुद्धा घेता येईल. तानपुरा अथवा इलेक्ट्रॉनिक तानपुरा मशीन असणे आवश्यक.
४. रंगमंच सादरीकरण हा सुद्धा परीक्षेचाच भाग असल्याने त्याचे ध्वनीमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास मनाई असेल.
५. प्रत्येक परीक्षार्थीचे रंगमंच सादरीकरण स्वतंत्र होईल.

**ब. तोंडी परीक्षा -** **एकूण गुण – १७५**

**किमान गुण – ७०**

१. खालील रागांपैकी कोणत्याही चार रागांमध्ये आलाप, बोलआलाप, बोल तान, तानांसह बडाख्याल आणि मध्यलय बंदिश / योग्य विस्तारासह मसितखानी गत आणि रजाखानी गत -
    पुरिया धनाश्री, जयजयवंती, कामोद, बागेश्री, गौड सारंग, शंकरा.
२. खालील प्रत्येक रागामध्ये आलाप, बोल, आणि तानांसह द्रुत बंदिश / द्रुत गत.
    बहार, बसंत, मुलतानी, मारवा, मिया मल्हार, शुद्ध कल्याण.
३. वरील उल्लेखित कोणत्याही एका रागात चतरंग. (वाद्यांसाठी अनवट तालात आलाप तानांसह एक गत वाजविणे.)
४. गायनासाठी धमार / वाद्य वादनासाठी आडाचौताल मध्ये विस्तारासह गत.
५. गायनासाठी एक तराणा / वाद्य वादनासाठी झपताल मध्ये गत.
६. एक गझल अथवा भक्तीगीत.
७. ताल ओळखण्याची क्षमता तसेच खालील तालांची एकपट, दुप्पट, तिप्पट, चौपट हातावर टाळीधरून म्हणणे.
    धमार,दीपचंदी,तिलवाडा,तीनताल,झपताल,एकताल.
८. मागील परीक्षेतील रागांची उजळणी.

**तोंडी परीक्षेसाठी सूचना –**

१. प्रत्येक परीक्षार्थीची तोंडी परीक्षा स्वतंत्र होईल.
२. तोंडी परीक्षेदरम्यान परीक्षक, परीक्षार्थी, साथीदार व केंद्रव्यवस्थापक याव्यतिरिक्त इतर कुणीही असू नये.
३. या परीक्षेसाठी तानपुऱ्याच्या सहाय्याने गाणे / वादन करणे आवश्यक असेल. मॅन्युअल तानपुरा किंवा इलेक्ट्रॉनिक तानपुरा देखील ग्राह्य असेल.
४. तोंडी परीक्षेत तबला आवश्यक असेल. हार्मोनियम अथवा इतर साथसंगतीच्या वाद्यांचा उपयोग करता येणार नाही.
५. परीक्षा कक्षात भ्रमणध्वनी अथवा इतर रेकॉर्डिंग साहित्य नेण्यास सक्त मनाई असेल. विद्यार्थ्याने परीक्षेचे ध्वनीमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास मनाई असेल.

**+-+-+-+**

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

**संगीत (गायन / स्वरवाद्य) अभ्यासक्रम**

## <u>पदविका परीक्षा – भाग २</u>

**एकूण गुण – ४००**

---

**सैद्धांतिक :** **परीक्षेचा कालावधी – ३ तास / प्रश्नपत्र**

**एकूण गुण – १५०** **किमान गुण – ३० / प्रश्नपत्र**

या अभ्यासक्रमात सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**<u>प्रश्नपत्र – १</u>** **एकूण गुण – ७५**

१. षड्ज – पंचम आणि षड्ज - मध्यम भाव – माहिती.
२. भरत आणि शारंगदेव द्वारे करण्यात आलेल्या सारणा चतुष्टी प्रयोगाबद्दल माहिती.
३. मार्गी आणि देशी संगीत, कुतप यांची माहिती.
४. संगीतात तालवाद्याचे महत्व (शास्त्रीय, उप-शास्त्रीय, सुगम संगीत)
५. पदविका परीक्षा – २ पर्यंतच्या अभ्यासक्रमातील रागांची संपूर्ण माहिती तसेच त्यामधील साम्य व भेद यांचा अभ्यास.
६. अभ्यासक्रमातील रागांच्या विलंबित व मध्यलय बंदिशी / विलंबित आणि मध्यलय गत, आलाप आणि तान पं. भातखंडे आणि पं. पलुसकर स्वरलेखन पद्धतीत लिपीबद्ध करण्याची क्षमता.
७. खालील तालांची एकपट, दुप्पट,तिप्पट,चौपट,आणि आड लिपीबद्ध करण्याची क्षमता –
तीनताल, झपताल, धमार, एकताल, सुलताल, तिलवाडा
८. ठुमरी व त्याच्या घराण्यांची माहिती.
९. तबल्याची संपूर्ण माहिती – वाद्याची आकृती काढून त्याच्या विविध भागांची नावे, तबला व डग्ग्यावर वाजणाऱ्या बोलांची माहिती.

**<u>प्रश्नपत्र – २</u>** **एकूण गुण – ७५**

१. योग आणि संगीत – प्राणायाम आणि त्याचे महत्व, आसने, मुद्रा बसण्याची पद्धती इत्यादी बद्दल माहिती.
२. कलावंत, पंडित, वाग्गेयकार, गमकेचे प्रकार यांची माहिती.
३. शुद्ध, छायालग, संकीर्ण, परमेल प्रवेशक राग, संधीप्रकाश राग.
४. ग्रंथांचा संक्षिप्त अभ्यास - क्रमिक पुस्तक मालिका, राग विज्ञान, हिंदुस्थानी संगीत पद्धती.
५. निबंध लेखन. – राग आणि रस, थाट पद्धती (प्राचीन आणि नवीन), मंच प्रदर्शन, संगीत शिक्षण पद्धती आणि वर्तमान समस्या, हवेली संगीत.
६. पाश्चात्य संगीत आणि कर्नाटक संगीताची माहिती.
७. भारतीय संगीताचा इतिहास (मध्ययुगीन काळ).
८. प्राचीन प्रबंध गायन पद्धती, त्याचे नियम आणि प्रकार.
९. आधुनिक आणि मध्यकालीन स्वर स्थापना.

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

**प्रात्यक्षिक:** **परीक्षेचा कालावधी - ३० मी.**

**एकूण गुण – २५०**

## अ. रंगमंच सादरीकरण - 

**एकूण गुण – ७५**

**किमान गुण – ३०**

अभ्यासक्रमातील कोणत्याही एका रागात बडाख्याल / विलंबित गत आणि द्रुत बंदिश / गत विस्तारासह किमान १५ ते २० मिनिटे सादर करणे. (प्रात्यक्षिक परीक्षेत गायलेल्या रागाव्यातिरिक्त)

### रंगमंच सादरीकरणासाठी सुचना –

१. तोंडी परीक्षेव्यतिरिक्त रंगमंच सादरीकरणासाठी १५ ते २० मिनिटांचा वेळ निश्चित करण्यात आला आहे.
२. रंगमंच सादरीकरण होत असताना इतर परीक्षार्थी, श्रोता उपस्थित राहू शकतात.
३. रंगमंच सादरीकरणात तबल्याबरोबरच हार्मोनियम सुद्धा घेता येईल. तानपुरा अथवा इलेक्ट्रॉनिक तानपुरा मशीन असणे आवश्यक.
४. रंगमंच सादरीकरण हा सुद्धा परीक्षेचाच भाग असल्याने त्याचे ध्वनीमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास मनाई असेल.
५. प्रत्येक परीक्षार्थीचे रंगमंच सादरीकरण स्वतंत्र होईल.

## ब. तोंडी परीक्षा - 

**एकूण गुण – १७५**

**किमान गुण – ७०**

१. खालील रागांपैकी कोणत्याही चार रागांमध्ये विस्तारासह बडाख्याल / विलंबित गत. ज्यापैकी एक ख्याल / गत ताल झुमरा मध्ये, एक ख्याल / गत ताल तिलवाडा आणि एक ख्याल / गत एकताल मध्ये. (वाद्यांसाठी ख्याल पद्धतीने वाजवीत नसल्यास आलाप, जोड इत्यादी वाद्याच्या अंगाने विस्तार करून विलंबित तीनताल आणि झपतालात गत वाजविणे) आणि द्रुत बंदिश / गत.
    पुरिया, गौड मल्हार, मधुवंती, मियां कि तोडी, शुद्ध कल्याण, मियां मल्हार.
२. खालील रागांमध्ये आलाप, बोल, आणि तानांसह द्रुत बंदिश / गत.
    हिंडोल, बसंत, दुर्गा, विभास, ललत, मारू बिहाग
३. गायनासाठी एक तराणा / वाद्य वादनासाठी मत्ततालात गत.
४. एक दादरा अथवा होरी (उप – शास्त्रीय संगीतात प्रयुक्त होणाऱ्या कोणत्याही एका रागामध्ये).
५. अभ्यासक्रमातील कोणत्याही एका रागात त्रीवट / वाद्य वादनासाठी वेगळ्या तालात गत.
६. अभ्यासक्रमातील रागांचा शास्त्रीय अभ्यास.
७. खालील तालांचा अभ्यास तसेच दुप्पट, तिप्पट चौपट आणि आडलय हातावर टाळीधरून म्हणण्याची क्षमता.
    तीनताल, झपताल, धमार, एकताल, सुलताल, तिलवाडा
८. मागील परीक्षेतील रागांची उजळणी.

### प्रात्यक्षिक परीक्षेसाठी सूचना –

१. प्रत्येक परीक्षार्थीची तोंडी परीक्षा स्वतंत्र होईल.
२. तोंडी परीक्षेदरम्यान परीक्षक, परीक्षार्थी, साथीदार व केंद्रव्यवस्थापक याव्यतिरिक्त इतर कुणीही असू नये.
३. या परीक्षेसाठी तानपुऱ्याच्या सहाय्याने गाणे / वादन करणे आवश्यक असेल. मॅन्युअल तानपुरा किंवा इलेक्ट्रॉनिक तानपुरा देखील ग्राह्य असेल.
४. तोंडी परीक्षेत तबला आवश्यक असेल. हार्मोनियम अथवा इतर साथसंगतीच्या वाद्यांचा उपयोग करता येणार नाही.
५. परीक्षा कक्षात भ्रमणध्वनी अथवा इतर रेकॉर्डिंग साहित्य नेण्यास सक्त मनाई असेल. परीक्षेचे ध्वनीमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास मनाई असेल.

+-+-+-+

BVSPA CERTIFICATE DIPLOMA

# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

**संगीत (गायन / स्वरवाद्य) अभ्यासक्रम**

## <u>उच्च पदविका परीक्षा – भाग १</u>

**एकूण गुण – ५००**

---

**सैद्धांतिक :** **परीक्षेचा कालावधी – ३ तास / प्रश्नपत**

**एकूण गुण – २००** **किमान गुण – ४० / प्रश्नपत्र**

या अभ्यासक्रमात सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**<u>प्रश्नपत्र – १</u>** **एकूण गुण – १००**

१. स्वर शास्त्र – तारेची लांबी आणि कंपनसंख्या याचे गुणोत्तर व संबंध.
२. नवीन बंदिश / गत रचना करण्याची क्षमता.
३. लोक संगीताबद्दल सविस्तर माहिती तसेच महाराष्ट्रातील लोक संगीतातील भारुड, गोंधळ, पोवाडा यांचा विस्तृत अभ्यास.
४. संगीताची उत्पत्ती आणि विकास या संदर्भात भारतीय आणि पश्चिमी मत.
५. या वर्षीच्या अभ्यासक्रमातील सर्व रागांचा शास्त्रीय अभ्यास, समप्रकृतिक रागांशी तुलना.
६. उच्च पदविका – १ अभ्यासक्रमातील रागांचे विलंबित ख्याल व बंदिशी / विलंबित व मध्यलय गत आलाप, तान आणि तीहाई पं. भातखंडे आणि पं. पलुस्कर लिपीमध्ये लिपीबद्ध करणे.
७. हार्मोनियम वाद्याची संक्षिप्त माहिती – उत्पत्ती, विकास आणि रचना.
८. तालाची बीआड लिपिबद्ध करणे,
   तीनताल, झपताल, रूपक, दीपचंदी, एकताल, धमार

**<u>प्रश्नपत्र – २</u>** **एकूण गुण – १००**

१. भरत आणि शारंगदेव कालीन संगीताची संपूर्ण माहिती.
२. नाट्यशास्त्र ग्रंथाबद्दल माहिती
३. उपयोजित संगीत - (अर्थ, स्वरूप, व्याप्ती, जिंगल, पार्श्वसंगीत, जाहिरात आणि संगीत, व्यायामासाठी संगीत इ.)
४. भारतीय संगीताचा इतिहास (आधुनिक काळ).
५. भारतीय चित्रपट संगीत आणि संगीत दिग्दर्शक यांची माहिती.
६. रस – व्याख्या, रसाचे प्रकार, संगीतात रसाचे महत्व, स्वर – एस, लय – रस, राग – रस, छंद – रस यांचे विश्लेषण.
७. सौंदर्यशास्त्राची व्याख्या, स्वरूप, संगीतात सौंदर्य निर्मिती करणारे घटक.
८. चरित्र - सदारंग, अदारंग, उ. अब्दुल करीम खान, पं. गजाननबुवा जोशी, पं. भीमसेन जोशी, पं. शिवकुमार शर्मा.

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

**प्रात्यक्षिक :** **परीक्षेचा कालावधी - ४० मी.**

**एकूण गुण – ३००**

## १.रंगमंच सादरीकरण

**एकूण गुण – १२५**

**किमान गुण – ५०**

अ. अभ्यासक्रमातील एका रागात गायन/ वादन ज्यामध्ये विलंबित आणि द्रुत बंदिश / गत आणि विशिष्ट गायकीचा / वादन शैलीचा अभ्यास. (प्रात्यक्षिक परीक्षेत गायलेल्या रागाव्यातिरिक्त) एकूण गुण - १००

आ. उप-शास्त्रीय. एकूण गुण – २५

## रंगमंच सादरीकरणासाठी सुचना –

१. तोंडी परीक्षेव्यतिरिक्त रंगमंच सादरीकरणासाठी १५ ते २० मिनिटांचा वेळ निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये शास्त्रीय व उप- शास्त्रीय दोन्हींचा अंतर्भाव असेल.
२. उप- शास्त्रीय संगीतातील ठुमरी अथवा दादरापैकी कोणतेही एक .
३. रंगमंच सादरीकरण होत असताना इतर परीक्षार्थी, श्रोता उपस्थित राहू शकतात.
४. रंगमंच सादरीकरणात तबल्याबरोबरच हार्मोनियम सुद्धा घेता येईल. सादरीकरणात परीक्षार्थी स्वत: तानपुरा वाजवून गाणे आवश्यक. वाद्य वादन परीक्षार्थी स्वत: मन्युअल तानपुरा मिळवून इतर कुणाला सादरीकरणा दरम्यान वाजवायला देऊ शकतील.
५. रंगमंच सादरीकरण हा सुद्धा परीक्षेचाच भाग असल्याने त्याचे ध्वनीमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास मनाई असेल.
६. प्रत्येक परीक्षार्थीचे रंगमंच सादरीकरण स्वतंत्र होईल.

## २. प्रात्यक्षिक परीक्षा

**एकूण गुण – १७५**

**किमान गुण – ७०**

१. खालील रागांचा सविस्तर अभ्यास आणि कोणत्याही पाच रागांमध्ये बडाख्याल / मसितखानी गत आणि द्रुत बंदिश / रजाखानी गत विस्तारासह. एक ख्याल / गत रूपक मध्ये आणि एक झपताल मध्ये.
श्याम कल्याण, शुद्ध सारंग, अहिर भैरव, मेघ / मेघ मल्हार, मारवा, रागेश्री, पूर्वी.
२. खालील रागांचा संक्षिप्त अभ्यास (विस्तारासह).
किरवाणी, मधुवंती, कलावती, चंद्रकौंस, बिलासखानी तोडी, बिहागडा, जोग.
३. वरील उल्लेखित कोणत्याही एका रागात त्रीवट.(वाद्यासाठी तंत्र अंगाची गत.)
४. अभ्यासक्रमातील दोन रागांमध्ये तराणे / वाद्य वादनासाठी वेगळ्या तालात दोन गती.
५. एक ठुमरी (उप – शास्त्रीय संगीतात प्रयुक्त होणाऱ्या कोणत्याही एका रागामध्ये).
६. गायन / वादनात विविध तिहाइंचा वापर करता येण्याची क्षमता.
७. अभ्यासक्रमातील रागांचा शास्त्रीय अभ्यास तसेच अभ्यासक्रमातील रागांच्या जवळील रागांचा अभ्यास.
८. मागील परीक्षेतील रागांची उजळणी.
९. तालाची बीआड हातावर म्हणण्याची क्षमता,
तीनताल, झपताल, रूपक, दीपचंदी, एकताल, धमार

BVSPA CERTIFICATE DIPLOMA

**प्रात्यक्षिक परीक्षेसाठी सूचना –**

१. प्रत्येक परीक्षार्थीची तोंडी परीक्षा स्वतंत्र होईल.
२. तोंडी परीक्षेदरम्यान परीक्षक, परीक्षार्थी, साथीदार व केंद्रव्यवस्थापक याव्यतिरिक्त इतर कुणीही असू नये.
३. या परीक्षेसाठी परीक्षार्थीने तानपुरा जुळवून त्या आधारे गाणे अनिवार्य असेल.
४. वाद्य वादन परीक्षेमध्ये परीक्षार्थीस तानपुरा जुळवता येणे आवश्यक असेल.
५. तोंडी परीक्षेत तबला आवश्यक असेल. हार्मोनियम अथवा इतर साथसंगतीच्या वाद्यांचा उपयोग करता येणार नाही.
६. परीक्षा कक्षात भ्रमणध्वनी अथवा इतर रेकॉर्डिंग साहित्य नेण्यास सक्त मनाई असेल. परीक्षेचे ध्वनीमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास मनाई असेल.

+-+-+-+

BV SPA CERTIFICATE DIPLOMA

# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

**संगीत (गायन / स्वरवाद्य) अभ्यासक्रम**

## उच्च पदविका परीक्षा – भाग २

**एकूण गुण – ५००**

---

**सैद्धांतिक :** **परीक्षेचा कालावधी – ३ तास / प्रश्नपत्र**

**एकूण गुण – २००** **किमान गुण – ४० / प्रश्नपत्र**

या अभ्यासक्रमात सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**प्रश्नपत्र – १** **एकूण गुण – १००**

१. अभ्यासक्रमातील सर्व रागांचा शास्त्रीय अभ्यास तसेच मागिल सर्व रागांशी साम्य व भेद याचा अभ्यास.
२. आदर्श सभागृहाबद्दल माहिती.
३. संगीत रत्नाकर ग्रंथाबद्दल विस्तृत माहिती.
४. ध्वनी शास्त्र, रंगमंच ध्वनी व्यवस्था.
५. अभ्यासक्रमातील रागांच्या विलंबित – मध्यलय बंदिशी / गत, आलाप, तान आणि तिहाई, धृपद, धमार लिपीबद्ध करणे.
६. प्राथमिक परीक्षा ते उच्च पदविका परीक्षेच्या अभ्यासक्रमातील विविध तालांची आड, कुआड लिपीबद्ध करण्याची क्षमता.
७. समान मात्रासंख्या असलेल्या तालांचा तुलनात्मक अभ्यास.
   उदा – तीनताल – तिलवाडा, एकताल – चौताल, युपक – तेवरा, झपताल – सूलताल, धमार – झुमरा इत्यादी.
८. निबद्ध गान आणि त्याचे विविध प्रकार तसेच तंतू वाद्याच्या विविध रचनांचे विस्तृत विश्लेषण.
९. सतार वाद्याची माहिती – रचना, विविध भागांची माहिती, वादन पद्धती, त्यातील घराण्यांची थोडक्यात माहिती.

**प्रश्नपत्र – २** **एकूण गुण – १००**

१. उत्तर भारतीय आणि कर्नाटक संगीताची तुलना तसेच त्यातील प्रबंध (गीत) प्रकारांची माहिती.
२. भारतीय वाद्यांचे प्राचीन वर्गीकरण तसेच खालील वाद्यांची माहिती,
   मृदंग, हुडूक्का, विपंची, किनारी, वंशी.
३. नवराग निर्मितीचे सिद्धांत.
४. गुरु - शिष्य परंपरा. (परंपरा, स्वरूप, आजच्या काळातील स्वरूप)
५. संगीत विषयक लेखन - समीक्षा, वृत्तपत्रीय लेखन, चरित्र लेखन, आत्मचरित्र, ललित लेखन.
६. संगीत रचनेचे तत्व – स्वरसंगती, लय, छंद, काव्यार्थ, भाषा, उपयुक्त वाद्ये इत्यादीचे विवेचन.
७. भारतीय संगीतात साथ संगतीचे महत्व आणि संगतकारांची मनोभूमिका.
८. आवाज साधना.

BVSPA CERTIFICATE DIPLOMA

**प्रात्यक्षिक :** **परीक्षेचा कालावधी - ४० मी.**

**एकूण गुण – ३००**

## १. रंगमंच सादरीकरण

**एकूण गुण – १२५**

**किमान गुण – ५०**

अ. अभ्यासक्रमातील एका रागात गायन/ वादन ज्यामध्ये विलंबित आणि द्रुत बंदिश / गत आणि विशिष्ट गायकीचा / वादन शैलीचा अभ्यास. (प्रात्यक्षिक परीक्षेत गायलेल्या रागाव्यातिरिक्त) एकूण गुण - १००

आ. उप – शास्त्रीय एकूण गुण – २५

### रंगमंच सादरीकरणासाठी सुचना –

१. प्रात्यक्षिक परीक्षेव्यतिरिक्त रंगमंच सादरीकरणासाठी १५ ते २० मिनिटांचा वेळ निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये शास्त्रीय व उप- शास्त्रीय दोन्हींचा अंतर्भाव असेल.

२. उप- शास्त्रीय संगीतातील ठुमरी, दादरापैकी कोणतेही एक.

३. रंगमंच सादरीकरण होत असताना इतर परीक्षार्थी, श्रोता उपस्थित राहू शकतात.

४. रंगमंच सादरीकरणात तबल्याबरोबरच हार्मोनियम सुद्धा घेता येईल. सादरीकरणात परीक्षार्थी स्वत: तानपुरा वाजवून गाणे आवश्यक.

५. रंगमंच सादरीकरण हा सुद्धा परीक्षेचाच भाग असल्याने त्याचे ध्वनीमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास मनाई असेल.

६. प्रत्येक परीक्षार्थीचे रंगमंच सादरीकरण स्वतंत्र होईल.

## २. तोंडी परीक्षा

**एकूण गुण – १७५**

**किमान गुण – ७०**

१. खालील रागांचा सविस्तर अभ्यास आणि कोणत्याही पाच रागांमध्ये बडाख्याल / मसितखानी गत आणि द्रुत बंदिश / रजाखानि गत विस्तारासह ज्यापैकी एक ख्याल / गत आडाचौतालात तसेच विशिष्ट गायकी आणि वादन शैलीचा अभ्यास.

बैरागी, बिलासखानी तोडी, कोमल रिषभ आसावरी, जोग, दरबारी कान्हडा, छायानट, नट भैरव.

२. खालील रागांचा संक्षिप्त अभ्यास (विस्तारासह)

भूपाल तोडी, नंद, शंकरा, हंसध्वनी, हिंडोल, नायकी कान्हडा, श्री.

३. टप्पा गायन.(वाद्यांसाठी टप्पा अंगाने वादन)

४. अभ्यासक्रमातील रागात परीक्षकांच्या म्हणण्यावरून सरगम गीत, बंदिश / गत रचणे.

५. दोन तराणे / अनवट तालांमध्ये दोन गत.

६. अभ्यासक्रमातील विविध तालांची आड, बिआड, कुआड म्हणण्याची क्षमता.

७. मागील परीक्षेच्या रागांची उजळणी.

### प्रात्यक्षिक परीक्षेसाठी सूचना –

१. प्रत्येक परीक्षार्थीची तोंडी परीक्षा स्वतंत्र होईल.

२. तोंडी परीक्षेदरम्यान परीक्षक, परीक्षार्थी, साथीदार व केंद्रव्यवस्थापक याव्यतिरिक्त इतर कुणीही असू नये.

३. या परीक्षेसाठी परीक्षार्थीने तानपुरा जुळवून त्या आधारे गाणे अनिवार्य असेल.

४. वाद्य वादन परीक्षेमध्ये परीक्षार्थीस तानपुरा जुळवता येणे आवश्यक असेल.

५. तोंडी परीक्षेत हार्मोनियम अथवा इतर साथसंगतीच्या वाद्यांचा उपयोग करता येणार नाही.

६. परीक्षा कक्षात भ्रमणध्वनी अथवा इतर रेकॉर्डिंग साहित्य नेण्यास सक्त मनाई असेल. परीक्षेचे ध्वनीमुद्रण अथवा चित्रीकरण करण्यास मनाई असेल.

+-+-+-+

BVSPA CERTIFICATE DIPLOMA














५ वा मजला, स्कूल ऑफ परफॉरमिंग आर्टस, नवीन इमारत,
भारती विद्यापीठ शिक्षण संकुल, एरंडवणे, कोथरूड, पौड रोड, पुणे
४११०३८

अध्यापन कार्यालय : ०२० - २९९९६९६
अभ्यासक्रम संदर्भातील माहिती : +९१ ८६२३०२७०७८

Website : http://spa.bharatividyapeeth.edu
Email : bvspa.pune@gmail.com
bvduspa_official bvduspa